**अतिरिक्त महापलिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका, पुणे
जा. क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/५०२२
दिनांक : ११/१०/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :-** सुधारित आश्वासित योजने अंतर्गत दिलेला ग्रेड पे शासनाप्रमाणे देणेबाबत.

**संदर्भ :-** १. आज्ञापत्र जा.क्र. अतिमआ(इ)/साप्रवि/आस्था-४/४००३, दि. २७/०८/२०१९.
२. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/३२५, दि. २८/०९/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गातील लिपिक टंकलेखक या पदावरुन "वरिष्ठ लिपिक वर्ग-३" (वेतन श्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० + मान्य भत्ते) या पदावर संदर्भ क्र. १ च्या आज्ञापत्रान्वये तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.

ज्या कर्मचाऱ्याने सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी [वरिष्ठ लिपिक (४१००) / सरलेखनिक (४६००) / उप अधिक्षक / कार्यालय अधिक्षक (४८००)] स्विकारली अशा सेवकांना पदोन्नती दिल्याने ग्रेड पे कमी होवून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दिलेला लाभ या पदोन्नतीमुळे रद्द झाला असलेबाबत लेखनिकी सेवकांनी तक्रार अर्ज दिले आहेत.

सदर लेखनिकी संवर्गातील सेवकांनी आश्वासित / सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत मे.महाराष्ट्र शासनाप्रमाणे देय असणारा ग्रेड पे [वरिष्ठ लिपिक (२८००) / उप अधिक्षक (४२००)] त्यांचे पदोन्नतीचे आज्ञापत्राचे दिनांकापासून देण्यात यावेत, अशी विनंती केली आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गातील "लिपिक टंकलेखक या पदावरुन "वरिष्ठ लिपिक वर्ग-३" (वेतन श्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० + मान्य भत्ते) या पदावर तदर्थ पदोन्नती दिलेल्या सेवकांचे मे. महाराष्ट्र शासनाचे दि. २६/०८/२०१४ रोजी मंजुरी दिलेल्या आकृतीबंधातील वेतन बँण्ड व ग्रेड पेबाबतची अट क्र. १ व त्याबाबत मे. उच्च न्यायालयात, पुणे महानगरपालिका कामगार युनियनने दाखल केलेल्या दाव्याच्या निकालास अधीन राहून, ज्या सेवकांनी सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी स्वीकारली असेल (वरिष्ठ लिपिक / उप अधिक्षक) त्यांना आश्वासित / सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत मे. महाराष्ट्र शासनाप्रमाणे देय असणारा ग्रेड पे [वरिष्ठ लिपिक (२८००) / उप अधिक्षक (४२००)] त्यांचे पदोन्नतीचे आज्ञापत्राचे दिनांकापासून देणेस मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सर्व खातेप्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व संबधितांना वरीलप्रमाणे पूर्तता करणेविषयी जरूर ती कार्यवाही करणेबाबत सूचना देण्याची तजविज करावी.

सदर सेवकांच्या सेवापुस्तकाची पडताळणी मुख्य लेखा व वित्त विभागाकडून करून घेण्यात यावी.

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

**प्रत :- खातेप्रमुख (सर्व)**, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील कार्यवाहीस्तव . . .

\\10.3.112.73\s-i\Dy Superintendent\Payprotect\Payscale Protection.docx-17